

# सार्वजनिक परिवहन कर्मचाऱ्यांना कोव्हीर्ड१९ पासून सुरक्षित करा

## जागतिक मागणी पत्र

**सार्वजनिक वाहतुक कर्मचारी हे कोव्हीर्ड१९ या साथीच्या विरोधी युध्दात आघाडीवर आहेत. त्यात वाहन चालक, तिकीट विक्री करणारे, वाहक, वाहन स्वच्छता कर्मचारी, वाहन देखभाल कर्मचारी, कार्यालयामधील कमचारी जे वाहन व्यवस्था चालू ठेवण्यासाठी आवश्यक सेवा पुरवतात; तसेच इतर कामगाराना कार्यालयात पोहोचवणारे, आजारी लोकांची काळजी घेणारे व आवश्यक गोष्टींचा पुरवठा करणारे हे सर्व कामगार येतात.**



आरोग्य व सुरक्षा साधनांच्या अपुऱ्या सोयीमुळे सार्वजनिक वाहतुक कर्मचाऱ्याना काम करताना वाढती जोखीम घ्यावी लागत आहे. झगात सुमारे १५० च्या वर कामगार कोव्हीर्ड१९ संसर्गामुळे मरण पावले आहेत व दिवसागणिक त्यांची संख्या वाढतेच आहे. हजारो कामगार सध्या या आजाराने ग्रस्त झाले आहेत. आरोग्य व सुरक्षा साधनांच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे सार्वजनिक वाहतुक कर्मचाऱ्यांची जोखीम वाढली आहे.

सार्वजनिक वाहतुक कर्मचाऱ्यांचे काम इतर कामगारांसह अविरत चालू राहणे अपेक्षित असल्यामुळे त्याना जास्त धोका आहे म्हणून हा व्यवसायिक आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये समाविष्ट असल्यामुळे अशा कामगारांची काळजी घेणे आवश्यक आहे. काही देशांनी आधीच कोव्हीर्ड१९ हा व्यवसायिक रोग समजून कामगारांना भरपाई देण्याचे ठरविले आहे.

**आरोग्य व सुरक्षा साधनांच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे सार्वजनिक वाहतुक कर्मचाऱ्यांची जोखीम वाढली आहे.**

सावजनिक वाहतुक कामगारांचे हे जोखमीचे काम करताना योग्य रीतीने संरक्षण केले पाहिजे. कोणत्याही कामगाराने अमर्याद धोका स्वीकारू नये वा त्याचा कर्तव्य पार पाडताना मृत्यु होता कामा नये. या विधानानुसार इंटरनॅशनल ट्रांसपोर्ट वर्कस फेडरेशन म्हणजेच आंतरराष्ट्रीय परिवहन कामगार संघटना कामगारांना खालील सुविधा देणे आवश्यक आहेत अशा मागण्या करीत आहेत.

## १. योग्य व पुरेशी व्यक्तीगत सुरक्षा उपकरणे

- हातमोजे , मुखावरण, हस्त रोगरोधकद्रव्य (सॅनिटायझर) आणिकिंवा पाणी व साबण
- हवेतील दुषित कण वा त्वचा स्पर्श यापासून सुरक्षा
- संसर्ग टाळण्यासाठी कामावरील गणवेश धुण्याची व्यवस्था
- उपकरणांचा सुरक्षित वापर वविल्हेवाट लावण्यासाठी प्रशिक्षण
- ही सर्व उपकरणे कामगारांना मोफत मिळावी

## २. कामाच्या ठिकाणी कमीत कमी संसर्ग व सामाजिक अंतर राखण्याची व्यवस्थेसह

- नियमित व मोफत कोव्हीर्ड१९ चाचणी
- वाहने, वसतीगृहे, कामाची जागा, तिकीट कार्यालये व डेपो यांची नियमितपणे स्वच्छता व र्निजंतुकीकरण
- प्रवासी भाडयाची रोकड विरहित देवाण घेवाण, तिकीट तपासणी न करणे, मागच्या दरवाजानेच प्रवेश (अपवाद फक्तअपंग प्रवासी), पर्पेक्स पडद्याची व्यवस्था, पुढच्या जागा रिकाम्या ठेवणे, मोजके प्रवासी, आवश्यक सेवेतील प्रवाशांना प्राधान्य, प्रवाशांसाठी मुखावरण उपलब्ध करणे, कर्ज वसुली स्थगिती, परिवहन महसुल लक्ष्य असू नये.
- संचारबंदीच्या काळात सार्वजनिक वाहतुक कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित प्रवास
- योग्य व पुरेशा साफसफाई सुविधा, सार्वजनिक शौचालय अपुरी असल्याने तसेच सामाजिकअंतर राखून त्याचा वापर करणे, पाण्याने योग्य स्वच्छता करणे यासाठी जास्त वेळ लागतो म्हणून कामगारांना अतिरिक्त वेळ आवश्यक.
- संकटप्रसंगी व धोका वाढल्यास कोणत्याही कारवाईची वा सुडाची भीती न बाळगता अशा धोकादायक कामातून माघार घेण्याचा हक्क.

## ३. असुरक्षित व आजारी कामगारांना स्वास्थ्य सुविधांच्या लाभासह

- ज्या कामगारांना स्वतःला वा कुटुंबातील सदस्यांना सदृश्य गंभीर धोका यामुळे अलगीकरण करावे लागत आहे तसेच आरोग्य समस्या वा गरोदरपणा हे प्रश्न असलेल्या कामगारांना पुरेसे वेतन वनोकरीची हमी.
- व्यापक आरोग्य सेवांचा लाभ ज्यात मानसिकआरोग्य पण समाविष्ट असेल
- कोव्हीर्ड१९ चा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संसर्ग झाल्यास पुरेशी भरपगारी रजा ववित्तीय भरपाई (उदा.संसर्ग, अलगीकरण वा बालसंगोपन)

## ४. सार्वजनिक वाहतुक कामगारांच्या महत्वाच्या भुमिकेस मान्यता मिळणे यासह

- वाढीव वेतन वा भत्ता
- व्यवसायिकव कोव्हीर्ड१९ च्या संसर्ग धोक्यासंबंधी योग्य व्यवस्थापन आणि काम करताना मृत्यु झाल्यास मोबदला व निवृत्ती वेतनाचा लाभ

## ५. व्यवसायिक आरोग्य व सुरक्षा बाबतीत कामगारांना नियमित समाचार व लेखी माहिती सह

- जलद माहिती पुरवठाणे, कोव्हीर्ड१९ च्या बाबतीत धोका, संसर्गव आरोग्यावर परिणाम या विषयी कामगारांना पुरेसे प्रशिक्षण देणे
- स्वतःचे अलगीकरण, संसर्ग व मृत्युदर यांचे लिंग, वांशिकता, जात व कामाचा प्रकार यावर विश्लेषणाद्वारे असमानता व जोखीम याचा अभ्यास करून प्रतिक्रीया देता येईल
- कोव्हीर्ड१९ संबंधी तक्रार वा माहिती देणाऱ्या कामगारांना संरक्षण देणे ज्यामुळे दुष्परिणामांची भिती न बाळगता कामगार पुढे येऊन निनावी सुद्धा माहिती देतील

## ६. कामगार संघटनांच्या हक्कां सह

- सर्व आरोग्य व सुरक्षा उपाय योजनांसंबंधी कामगार संघटनाशी सल्लामसलत व त्यांचा सहभाग आवश्यक
- कामावर, फिरतीवर वा अलगीकरणात असलेल्या कामगारांना प्रतिनिधीत्व उपलब्ध होण्यासाठी उपाय योजना

**वरील सर्व उपाय सार्वजनिक वाहतुक कर्मचारी मग ते कायम वा कंत्राटी असोत; त्यांचा रोजगार दर्जा, लिंग वा स्थलांतरीत स्थितीचा विचार न करता सर्वांना लागू झाले पाहिजेत.**

जागतिक वस्त्र उद्योगातील सुरक्षा उपकरणे तयार करणाऱ्या कामगारांच्या वेतन, आरोग्य व नोकरीची हमी अशा मागणीसंबंधी आवाहनाला आय. टी.एफ. या मागणीपत्राच्या आधारे पाठिंबा जाहिर करते.